**Newspaper Cuttings (2018-19)**

## Blood Group Detection Camp by Patel Senior College at Lauki

# पटेल महाविद्यालयातर्फे लौकी येथे रक्तगट तपासणी

**शिरपूर** : येथील आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सुक्ष्म जीवशास्त्र जैवतंत्रज्ञान विभागातर्फे बाळदे (ता.शिरपूर) येथे रक्तातील विविध घटक तपासणी व आरोग्य जनजागृतीसंबंधी शिबिर घेण्यात आले.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील होते. शिबिराचे उद्घाटन वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लौकी येथील नीलेश पाटील, उपसरपंच गुलाब पाटील, ग्रामपंचायत सदस्य अमोल पाटील, माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक जी.एन.बेहेरे, विकासो चेअरमन संजय पाटील, डॉ.अनिल सोनवणे उपस्थित होते. यावेळी डॉ.अमित गुजराथी यांनी विविध रोगांविषयी माहीती दिली. वैयक्तिक स्वच्छतेविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील यांनी शिबिराच्या उद्दिष्टाबद्दल माहिती दिली. सूत्रसंचालन दर्शना गवळे या विद्यार्थिनीने केले. या शिबिरास जि.प.शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. शिबिरात रक्तगट व रक्ताच्या इतर चाचण्या, सिकलसेल ॲनेमिया, हेपॅटीटीस बी, हिमोग्लोबीन, सीबीसी अशा विविध तपासण्या करण्यात आल्या. तसेच सुक्ष्म जीवशास्त्र जैवतंत्रज्ञान विभागातील ९५ विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून विविध रोगांविषयी माहिती, सार्वजनिक आरोग्याबाबत जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याच्या माध्यमातून आरोग्याविषयी व विविध रोगांविषयी प्रबोधन करण्यात आले. शिबिरात अमोल पाठक यांच्या कार्यक्रमांतर्गत विशेष सहकार्य लाभले. विभागप्रमुख डॉ.रवींद्र पाटील, विभागप्रमुख डॉ.संदीप पाटील, प्रा.महेश पाटील, प्रा.योगेश चौधरी, डॉ. अश्विनी पाटील, डॉ. मोहिनी पाटील, प्रा. लीना शिरसाठ, प्रा. अमृता जोशी, प्रा. अश्विनी सी. पाटील, प्रा. मृणाली ठाकरे, प्रा. जयश्री पवार, प्रा. स्वाती पवार, प्रा. अश्विनी कोळी, प्रा.शुभम यादव, प्रा.आकाश पवार, गणेश सोनार, संजय मोरे, बन्सीलाल चौधरी, डी. यू. पटेल, मेहुल गुजराथी, संदेश राजपूत आदींनी परिश्रम घेतले.



Appreciation of the program by Local Newspaper (लोकमत)

**Newspaper Cuttings (2020-21)**

**Online workshop conducted by R. C. Patel College of Shirpur**

लोकमत

## शिरपूरच्या आर.सी. पटेल महाविद्यालयात कार्यशाळा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

शिरपूर : येथील आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अंतर्गत 'एक पाऊल कोरोना मुक्तीसाठी' या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

डॉ.पितांबर दिघोरे म्हणाले, कोरोना (कोविड-१९) हा एक अतिसंसर्गजन्य रोग आहे. त्याची तपासणी, लक्षणे, कारणे, निदान, औषधी व उपचार पद्धती याविषयी त्यांनी उपयुक्त माहिती दिली. प्राचार्य डॉ.डी.आर. पाटील, डॉ.ए.जी. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमात २६० पेक्षा अधिक जणांनी सहभाग नोंदविला. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल बिडे, डॉ.ए.एम. पाटील, डॉ.एस.पी. पाटील, डॉ.अनिता मोरे, प्रा.राहुल माळी, प्रा.आर.पी. महाजन, डॉ.अनिता जाधव, डॉ.आर.पी. अग्रवाल, प्रा.रामकुमार सूर्यवंशी, प्रा.अपर्णा जगताप, प्रा.अशोक तीर्थाप, प्रा.जयश्री दोरिक, सपना येशी, प्रा.उमेश पाटील उपस्थित होते.

Hello Dhule
Page No. 2 Nov 19, 2020
Powered by: erelego.com

Local news featuring about the workshop on "How to take care of yourself and your family members in this Pandemic situation"

शनिवार ७.११.२०२०
पुण्य नगरी

# पटेल महाविद्यालयात 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' वर कार्यशाळा

**शिरपूर** : आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत 'माझे कुटुंब माझी जबाबदारी - एक पाऊल कोरोना मुक्तीसाठी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा ऑनलाईन आयोजित करण्यात आली.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' मोहिमेअंतर्गत या कार्यशाळेसाठी डॉ. पितांबर दिघोरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिता जाधव यांनी केले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल बिडे यांनी केले.

डॉ. पितांबर दिघोरे यांनी कोरोनाविषयी शास्त्रीय माहिती दिली. ते म्हणाले, कोरोना हा एक अतिसंसर्गजन्य रोग आहे. त्याची तपासणी, लक्षणे, कारणे, निदान, औषधी व उपचार पद्धती याविषयी उपयुक्त माहिती दिली. आभार प्रा. आर. पी. महाजन यांनी मानले. प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, डॉ. ए. जी. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला २६० पेक्षा अधिक जणांनी सहभाग नोंदविला. सर्वांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल बिडे तसेच डॉ. ए. एम. पाटील, डॉ. एस. पी. पाटील, डॉ. अनिता मोरे, प्रा. राहुल माळी, प्रा. आर. पी. महाजन, डॉ. अनिता जाधव, डॉ. आर. पी. अग्रवाल, प्रा. रामकुमार सूर्यवंशी, प्रा. अपर्णा जगताप, प्रा. अशोक तीर्थाप, प्रा. जयश्री दोरिक, सौ. सपना येशी, प्रा. उमेश पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

Appreciation by Local newspaper (पुण्य नगरी)

**Newspaper Cuttings (2021-22)**

**Blood Group Detection and Hygiene Awareness program by R. C. Patel Senior College**

# आर. सी. पटेल महाविद्यालयातर्फे बाळदे येथे रक्तगट तपासणी व आरोग्य जनजागृती



**शिरपूर** – येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्म जीवशास्त्र जैवतंत्रज्ञान विभागातर्फे बाळदे ता. शिरपूर येथे रक्तातील विविध घटक तपासणी व आरोग्य जनजागृती संबंधी सलग १७ वे शिबीर प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले.

शिबीराचे उद्घाटन डॉ. अमित गुजराथी (वैद्यकीय अधिकारी शिरपूर) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास बाळदे येथील निलेश विश्वासराव पाटील, उपसरपंच गुलाब बाबुलाल पाटील, ग्रामपंचायत सदस्य अमोल पाटील, माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक जी.एन.बेहेरे, संजय पंडीत पाटील (चेअरमन, वि.सो.), डॉ. अनिल सोनवणे उपस्थित होते. डॉ.अमित गुजराथी यांनी विविध रोगांविषयी माहीती दिली व वैयक्तिक स्वच्छते विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील यांनी शिबिराच्या उद्दिष्टाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दर्शना गवळे या विद्यार्थिनीने केले. या शिबीरास जि.प.शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी सहभाग नोंदवला. शिबीरात रक्तगट व रक्ताच्या इतर चाचण्या, सिकलसेल ॲनेमिया, हेपॅटीटीस बी, हिमोग्लोबिन, सी बी सी अशा विविध तपासणी करण्यात आल्या. तसेच सूक्ष्म जीवशास्त्र जैवतंत्रज्ञान विभागातील ९५ विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून विविध रोगांविषयी माहिती, सार्वजनिक आरोग्य याबाबत जि.प. शाळेतील विध्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याच्या माध्यमातून आरोग्याविषयी व विविध रोगांविषयी प्रबोधन करण्यात आले. शिबीरात अमोल पाठक यांचे कार्यक्रमाअंतर्गत विशेष सहकार्य लाभले. तसेच सर्व विद्यार्थी, विभागप्रमुख डॉ. रवींद्र पाटील, विभागप्रमुख डॉ. संदीप पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा. योगेश चौधरी, डॉ. अश्विनी पाटील, डॉ. मोहिनी पाटील, प्रा. लीना शिरसाठ, प्रा. अमृता जोशी, प्रा. अश्विनी सी. पाटील, प्रा. मृणाली ठाकरे, प्रा. जयश्री पवार, प्रा. स्वाती पवार, प्रा. अश्विनी कोळी, प्रा.शुभम यादव, प्रा.आकाश पवार, गणेश सोनार, संजय मोरे, बन्सीलाल चौधरी, डी. यू. पटेल, मेहुल गुजराथी, संदेश राजपूत आदींनी परिश्रम घेतले.

Appreciation of program by local newspaper (लोकमत)

**Newspaper Cuttings (2022-23)**

## Free Blood Group Detection and Hygiene Awareness Camp by Plasmid Club of The Department of Microbiology and Biotechnology

# देशोन्नती

## सूक्ष्मजीव व जैवतंत्रज्ञान विभागातील प्लाझमिड क्लब तर्फे मोफत रक्त गट तपासणी व आरोग्य जनजागृती शिबीर

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शिरपूर** ■ आर. सी. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीव व जैवतंत्रज्ञान विभागातील प्लाझमिड क्लब तर्फे भामपूर येथील आर. सी. पटेल मराठी माध्यमिक शाळेत एक दिवसीय मोफत रक्त गट तपासणी व विविध रोगांविषयी जनजागृतीपर सलग २३ वे शिबीरआयोजित करण्यात आले.



सदर शिबिरात एकूण ४०० विद्यार्थी व शिक्षकांची मोफत रक्तगट तपासणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील यांच्या हस्ते तसेच आर. सी. पटेल मराठी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक व्ही. पी. दिक्षित, डी. व्ही. ठाकरे, ए. ए. चौधरी, सौ. एस. डी. पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील व गणेश सोनार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख रवींद्र पाटील यांनी शिबिराच्या उद्दिष्टाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमृता जोशी यांनी केले. या शिबीरास शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी सहभाग नोंदवला. तसेच सूक्ष्मजीव व जैवतंत्रज्ञान विभागातील विभागातील एकूण २६० विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून विविध रोगांविषयी माहिती, सार्वजनिक स्वच्छता, मुलांचे आरोग्य यासारख्या अतिमहत्वाच्या गोष्टींवर शाळेतील विद्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

सूक्ष्मजीव व जैवतंत्रज्ञान विभागातील सर्व विद्यार्थी, प्रा. डॉ. रवींद्र पाटील, प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. महेश पाटील, प्रा. डॉ. अश्विनी पाटील, प्रा. डॉ. मोहिनी पाटील, प्रा. डॉ. लीना शिरसाठ, प्रा. अश्विनी सी. पाटील, प्रा. अमृता जोशी, प्रा. हर्षा परदेशी, प्रा. वर्षा जयस्वाल, प्रा. दर्शन गवळे, प्रा. तेजस चौधरी, प्रा. जय पाटील, गणेश सोनार, संजय मोरे, बन्सीलाल चौधरी, डी. यू. पटेल, मेहुल गुजराथी, लक्षीकांत मोरे, संदेश राजपूत आदींनी प्रयत्न केले.

Appreciation by local newspaper (देशोन्नती)